# टायर पायरोलिसेस रिसायकलींग कंपन्यांची चौकशी करा

- जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती
- पालकमंत्री गणेश नाईक यांचे निर्देश



**वाडा, दि. १२ : प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील टायर पायरोलिसि रिसायकलींग कंपन्यामधील तसेच इतर उद्योगांमधून होणाऱ्या प्रदूषणाबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून सर्वेक्षण करावे आणि या संबंधीचा अहवाल एक महिन्यात द्यावा, असे निर्देश वन मंत्री गणेश नाईक यांनी दिले.

पालघर जिल्ह्यातील रेड झोन परिसर वाडा तालुक्यातील टायर पायरोलिसिस रिसायकलींग कंपन्यामधील प्रदूषणाबाबत तसेच बोईसर औद्योगिक क्षेत्र व सातपाटी- मुरबे खाडी मधील रासायनिक प्रदूषण बाबत वन मंत्री नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. त्यावेळी नाईक बोलत होते.

यावेळी वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) शोमिता बिस्वास, पालघर जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड, प्रधान वन संरक्षक नरेश झिरमुरे, उपसचिव विवेक होशिंग, उदय ढगे आदी उपस्थित होते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

# आठवडी बाजारात खरेदीला गर्दी

## मान्सून पूर्व खरेदीत सुकी मासळीला मोठी मागणी

**तलासरी, दि. १२ : प्रतिनिधी**

पावसाची चाहूल लागताच मान्सूनपूर्व खरेदीला सुरुवात झाली असून तलासरी परिसरातील आदिवासी गावकरी, शेतकऱ्यांची आठवडी बाजारात एकच झुंबड उडाली आहे. तालुक्यातील आजूबाजूच्या गाव, खेड्यापाड्यांमधील आदिवासी बांधव व शेतकरीवर्ग शेतीपूर्व कामाला लागतो. त्यामुळे त्यांना तीन ते चार महिने बाजार- करता येत नाही. पावसाळ्यात शेती हंगाम सुरु झाल्यानंतर बाजारात जाऊन खरेदी करण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे हे शेतकरी मान्सूनपूर्व पावसाळ्याच्या हंगामासाठी पावसाळा भर पुरेल इतक खरेदी करतात

या चार महिन्यासाठी सुकी मासळी, मसाले, कडधान्ये, डाळी, हळद, कांदे, बटाटे, चिंच, कोकम, फाटी, जनावरांसाठी पेंढा अशा अनेकविध गरजेच्या वस्तू खरेदी करून तीन ते चार महिने पुरेल असा साठा करून ठेवला जातो. त्यामुळे सध्या तालुक्यात ठिकठिकाणी भरणाऱ्या आठवडी बाजारात मान्सूनपूर्व खरेदीसाठी आदिवासी शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी होऊ लागली आहे.

आज महागाईचा भस्मासुर सर्वसामान्यांच्या खिशाला चाट देत असतानाही, खरेदी मात्र आवर्जून केली जात आहे. कारण एकदा का शेती हंगाम सुरु झाला की, आवश्यक वस्तू मिळवणे तसेच बाजारात जाणे अवघड होऊन बसते. विशेषतः ग्रामीण भागात पावसाळ्यात हवा तेव्हा हवी ती वस्तू मिळेलच याची खात्री नसते, त्यामुळे पूर्वतयारी म्हणून मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते.



गुजरात राज्यामधील उबरगाव, संजान, खतलवाडा, मरोली, फणसा आदी भागांतून सुकी मासळी विक्रेत्या महिला तलासरी, उधवा, धुंदलवाडी, बोरमाळ, आच्छाड, उपलाट, आमगाव, झरी इत्यादी गावांमध्ये आठवडी बाजारांत सहभागी होत आहेत. या बाजारांमध्ये शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दिसून येत असून सुकी मासळी खरेदीसाठी चांगलीच झुंबड उडालेली आहे.

या बाजारात दाढा, सुरमई, घोळ, मुशी, करली, मांदेली, बोंबील, जवळा, कोळंबी, वागटी, बांगडे, कोळीब, सुकट, खारे, लसिंगे अशा विविध प्रकारच्या सुक्या मासळीचा समावेश आहे आणि त्याला चांगली मागणीही आहे. आदिवासी महिला भात व कडधान्ये देवूनही सुक्या मासळीची खरेदी करीत असतात. या महिन्यात जोरदारपणे विक्री सुरु असल्याने सुकी मासळी विक्रेत्यांचा धंदा तेजीत आहे. त्यामुळे या आठवडी बाजारात मान्सूनपूर्व खरेदीसाठी शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने दाखल होत आहे.

### सुकी मासळीचे दुप्पट भाव

यंदा सुकी मासळी दुपटीने महागली असून दाढा 1400 ते 1500 रुपये प्रति किलो, सुरमई 1200 ते 1300 रुपये प्रति किलो, बोंबील 500 ते 600 रुपये किलो, जवळा 100 ते 150 रुपये वाटा, कोळंबी 150 ते 200 रुपये वाटा दराने विकली जात आहे. सुके मासे दुपटीने महाग झाले असले तरी, याच साठ्यावर पावसाळा काढायचा असल्यामुळे त्याचीच खरेदी सध्या ग्रामीन भागात जोरात सुरु आहे.

# औषध कंपनीत ड्रग्ज तयार करण्याचा कारखाना; मुंबई पोलिसांची कारवाई, 36 लाखांचे ड्रग्ज जप्त

**बोईसर, दि. १२ : प्रतिनिधी**

बोईसर एमआयडीसीमधील एका औषध कंपनीमध्ये एमडी ड्रग तयार करण्याचे काम सुरू असताना मुंबई पोलिसांनी तेथे छापा टाकून ३६लाख ५७ हजार रुपये किमतीचे एमडी ड्रग जप्त केले. या कारवाईमध्ये तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

बोईसर एमआयडीसीमधील प्रोकेम फार्मासिटिकल लॅब या कंपनीमध्ये एमडी ड्रगचे उत्पादन होऊन मुंबईत विविध विभागात त्याचा पुरवठा केला जात असल्याची माहिती मुंबई पोलिसांना मिळाली होती. त्यावरून मुंबई पोलिसांच्या पथकाने या ड्रग बनवणाऱ्या कंपनीवर छापा टाकला आणि त्यामध्ये ३६ लाख 57 हजार रुपयांचे एमडी ड्रग, व दोन मोटरसायकली, सहा मोबाइल फोन मिळून ५० लाख रुपयांचे साहित्य माल जप्त केला आहे.

याकारवाईत पोलिसांनी विजय खटके, प्रतीक जाधव, फरहान गुलजार खान अशा तीन जणांना अटक करण्यात आली आहे. मुंबईत अंधेरी एमआयडीसी पोलिसांची गस्त सुरू असताना एका स्कोडा कारची तपासणी केली असता या गाडीचा चालक फरहान गुलजार खान याच्याजवळ ७१ ग्रॅम एमडी ड्रग सापडले. त्याची किंमत २ लाख ८० हजार रुपये आहे. चौकशीदरम्यान प्रतीक जाधवचे नाव समोर येऊन पोलिसांनी त्यालादेखील अटक केली. त्याच्याकडे २१५ ग्रॅम एमडी ड्रग सापडले. त्याची किंमत ८ लाख ६० हजार रुपये आहे.

या दोन्ही आरोपींच्या अटकेनंतर बोईसर एमआयडीसीत ड्रग बनवण्याचा कारखाना असल्याची माहिती पोलीसंच्या हाती लागली होती. त्यावरून बोईसर एमआयडीसीत एका ठिकाणी छापा घालून विजय खटके याला अटक करण्यात आली होती. त्याठिकाणच्या कंपनीमध्ये ११ लाख २० हजार रुपयांचे ड्रग आणि कच्चा माल व उपकरणे पोलिसांनी ताब्यात घेतली. तिन्ही आरोपींना न्यायालयामध्ये हजर करण्यात आले असता ७ दिवस पोलिस कोठडी देण्यात आली आहे.


MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-Tender Notice

Following Tender is invited in prescribed Tender forms for following Works/Items from reputed E-registered contractors with MSEDCL for following work.

| Tender Number | Name of Tender | Tender Amount (Rs. In Lakhs) | Tender Fees | Last date of submission |
|---|---|---|---|---|
| EE/VSI/T-03/ 2025-26/ Crane | E-tender for annual contract for handling of Transformer by Crane under jurisdiction of Vasai Division for year 2025-26. | 5.00 | 1000/- + GST@ 18% | 18/06/2025 18:30 Hrs. |
| EE/VSI/T-04/ 2025-26/ AMC | E-Tender Annual Maintenance of Computers, Printers, Scanners, UPS System, all associated equipment's & Networking located under Vasai Division office, Vasai Rd East, Vasai Rd. West, Vasai Urban sub division & Vasai Flying Squad division under Vasai Division. | 10.00 | 1000/- + GST@ 18% | 19/06/2025 11:00 Hrs. |

The tender documents are available at our website https://etender.mahadiscom.in/eatApp/ from 12.06.2025. For updates visit to our official website of MSEDCL.

Sd/-
EXECUTIVE ENGINEER, VASAI DIVISION


# ऐना आरोग्य केंद्रातील भंगार चोरी प्रकरणाची चौकशी

## डॉक्टर, कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**डहाणू, दि. १२ : प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील ऐना प्राथमिक आरोग्य केंद्रातील भंगार चोरी प्रकरणावर आता प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. ऐना आरोग्य केंद्रातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच याप्रकरणाची सखोल चौकशी सुरु करण्यात आली असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले आहे. त्यामुळे भारताचा मार्क्सवादी लेनिनवादी पक्षाच्या लाल बावटा कार्यकर्त्यांनी १३ जूनपासून नियोजित 'भिक मांगो आंदोलन' तात्पुरते स्थगित केले आहे.

ऐना आरोग्य केंद्रातील भंगार सामान चोरीचा पर्दाफाश लाल बावटा पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केला होता. याप्रकरणाची गांभीर्याने दखल घेत कार्यकर्त्यांचा पक्षाच्या राज्य सचिवांनी



सत्कारही केला होता. या प्रकारावर कठोर कारवाई करावी, अशी सातत्याने मागणी करण्यात येत होती.

याच पार्श्वभूमीवर डहाणूच्या गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते यांच्या दालनात बैठक झाली. यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी आणि लाल बावटा पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत संबंधित डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले आहे. तसेच, जिल्हास्तरीय अहवालासह पुढील कारवाईसाठी प्रस्ताव पाठवण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

"फक्त थातूरमातूर कारवाई नको, दोषींना सेवेतून बडतर्फ करावे अन्यथा लाल बावटा स्टाईलने आंदोलन उभारले जाईल. जर वेळेत कारवाई झाली नाही तर जिल्हा परिषद, पालघर येथे तीव्र आंदोलन छेडले जाईल. प्रशासनाने भंगार चोरीसारख्या गंभीर प्रकरणावर प्रथमच सकारात्मक पावले उचलली असली तरी लाल बावटा कार्यकर्त्यांचा दबाव कायम आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत चौकशीचा अहवाल आणि प्रत्यक्ष कारवाई कशी होते याकडे जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे, असे जिल्हा सहसचिव शेरू वाघ यांनी माहिती दिली.


## पाहिजेत

शास्त्री शिक्षण संस्थान, मुंबई अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थेच्या हिंदी माध्यमाच्या १००% अनुदानित शास्त्री विद्यालय हायस्कुल विरार ता. वसई, जि. पालघर प्राथमिक शाळेत सेवानिवृत्ती /मृत्यु/ राजिनामा या कारणाने रिक्त झालेल्या पुर्ण वेळ शिक्षण सेवक रिक्त पदाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

### हिंदी माध्यम - प्राथमिक विभाग

| अ. क्र. | रिक्तपदाचा तपशिल | गट | शैक्षणिक पात्रता | संवर्ग | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक शिक्षक/ 1 रिक्त पद (मृत्युमुळे) | १ ली ते ५ वी | H.S.C,D.ED /TET/CTET | खुला | १६,०००/- |

शिक्षण सेवक इयत्ता १ ली ते ५वी गटात शिक्षण सेवक पदावरील नियुक्ती करिता पात्र असलेल्या उमेदवारांची निवड करण्यात येईल. वरील रिक्त पद पदभरती करिता शैक्षणिक पात्रता धारण करणा-या मराठी/हिंदी माध्यमाच्या उमेदवारांना दिनांक १९/०६/२०२५ रोजी मुळ व साक्षांकीत कागदपत्रासह सकाळी ११.३० वाजता खालील पत्त्यावर समक्ष मुलाखतीस उपस्थीत राहावे स्थानिक व अनुसुचित जमातीच्या उमेदवारांना व हिंदी माध्यमाच्या उमेदवारांस प्राधान्य.

पत्ता :- सरोज सदन, विरार रेल्वे कॅबीन 'ए' के पास, विरार (पुर्व) जिल्हा पालघर, पिन कोड-४०१३०५.

मुख्याध्यापक
शास्त्री हिंदी हायस्कुल, विरार

संस्था सचिव
शास्त्री शिक्षण संस्था


# रेल्वे प्रवास प्रवाशांच्या जीविताची हमी देणारा असावा!

## माजी स्थायी समिती सभापती अजीव पाटील यांचे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना पत्र

**वसई, दि. १२ : प्रतिनिधी**

बोरिवलीच्या पुढे उत्तरेला पश्चिम रेल्वेवर वसई, नालासोपारा, विरार, केळवे, सफाळे, पालघर, बोईसर, डहाणू अशी लोकसंख्या वाढलेली शहरे उदयास येत आहेत. वसई, विरार, नालासोपारा या तीन रेल्वे स्थानक परिसरात स्थलांतरित लोकसंख्या वाढीने विक्रमी आकडा गाठला आहे. मुंबईत जाणारा सर्वात मोठा नोकरदार वर्ग याच भागात राहतो. या सर्व प्रवाशांना रोजचा रेल्वे प्रवास म्हणजे एक दुःस्वप्न ठरत आहे. कुटुंबाची जबाबदारी आणि जगण्याची मजबुरी यामुळे लोकांना या रेल्वे प्रवासातून सुटकाही नाही. आजचे मरण उद्यावर अशा पद्धतीने येथील प्रवासी रेल्वे प्रवास करताना दिसून येतात. अनेक वर्षांपासून येथील रेल्वे प्रवासी सतत मोठ्या अपेक्षेने सरकारकडून त्यांच्या या दयनीय प्रवासासाठी एखादा तोडगा यावा, यासाठी डोळे लावून असतात. रेल्वे प्रवास सुखकर नसला तरी किमान त्यांच्या जीविताची हमी देणारा सुरक्षित असावा इतपतच या प्रवाशांची माफक अपेक्षा आहे, अशा आशयाची आर्जव वसई-विरार महापालिका माजी स्थायी समिती सभापती अजीव पाटील यांनी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे केली आहे.

मुंब्रा-कळवा लोकल प्रवासात (9 जून 2025) अत्यंत दुर्दैवी अशी दुर्घटना घडली. या पार्श्वभूमीवर वसई-विरार महापालिका माजी स्थायी समिती सभापती अजीव पाटील यांनी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना पत्राद्वारे वसई, नालासोपारा, विरार, केळवे, सफाळे, पालघर, बोईसर, डहाणू परिसरातील लोकल प्रवाशांची व्यथा आणि त्या अनुषंगाने केंद्र सरकारकडून त्यांची असलेली अपेक्षा कळवली आहे.

मुंब्रा-कळवा लोकल दुर्घटनेचे प्रसार माध्यमे आणि समाजमाध्यमावरून त्याचे तीव्र पडसाद उमटले. रेल्वे प्रशासन आणि रेल्वेच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहे. चार-दोन दिवसांत ही घटना विस्मृतीत जाईल आणि सर्व जसे होते तसे सुरळीत सुरूही राहील. मात्र रेल्वे प्रवाशांची दुर्दशा, त्यांची रोजची प्रवासात होणारी गैरसोय या गोष्टी दुर्दैवाने पुन्हा उपेक्षितच राहतील, अशी खंत अजीव पाटील यांनी या पत्रात व्यक्त केली आहे. रेल्वे प्रशासनाच्या कार्यकक्षेत सतत मुंबई हे प्राधान्याने केंद्रस्थानी दिसून येते. बोरिवली आणि त्यापुढे चर्चगेटपर्यंत रेल्वे सोयीसुविधांवर रेल्वे जास्त प्रमाणात आपला निधी खर्च करताना दिसते. रेल्वेत ज्या काही सुधारणा होत असतात, नवनवीन गाड्या, नवीन थांबे, आधुनिक नूतनीकरण अशा सर्व बाबींसाठी मुंबई आणि तेथील रेल्वेस्थानके, प्रवासी हे केंद्रस्थानी ठेवले जाते असा आजवरचा अनुभव आहे, असे पाटील यांचे म्हणणे आहे.

प्रामुख्याने वसई, विरार, नालासोपारा या रेल्वे स्थानकांचा अभ्यास केल्यास येथे मागील पाच वर्षांत वाढलेली प्रवासी संख्या ही अनेक पटीने मोठी आहे. रेल्वे स्थानकांच्या प्लॅटफॉर्मवर उभेही राहता येत नाही इतकी प्रचंड गर्दी सकाळ आणि संध्याकाळच्या सत्रामध्ये असते. सर्वदूर फोफावलेल्या या शहरीकरणाच्या वेगात लोकसंख्या वाढीस अनुसरून पालघर, डहाणू तालुका, विरार व नालासोपारा, नालासोपारा ते वसई यात नवीन रेल्वे स्थानकांची निर्मिती होणे काळाची गरज आहे.

# महावितरणचे टीओडी मीटर असेल तरच सवलत

**वसई, दि. १२ : प्रतिनिधी**

महावितरणतर्फे सध्या राज्यात सर्वत्र आधुनिक टीओडी मीटर बसवण्यात येत आहेत. महावितरणच्या नव्या वीजदर प्रस्तावात ग्राहकाने वीज कधी वापरली त्या वेळेनुसार दरात सवलत देण्यात येणार आहे. टीओडी मीटर असल्याशिवाय ही सवलत मिळू शकणार नाही, अशी माहिती महावितरणच्या सूत्रांनी दिली.

राज्यातील ग्राहकांची मागणी लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी प्रीपेड मीटर बसवू नयेत असे जाहीर केले. सध्या पोस्टपेड मीटर बसवण्यात येत आहेत. त्यामुळे पहिल्यासारखेच विजेचा वापर केल्यावर बिल येणार आहे. आधुनिक मीटर असल्यामुळे अचूक रिडिंग आणि सातत्याने मोबाईलवर विजेचा वापर समजण्यासारख्या नव्या सुविधा मिळतील. मुख्य म्हणजे महावितरणकडून ग्राहकांकडे हा मीटर मोफत बसवण्यात येत आहे. इतके सगळे असूनही काहीजण नवे मीटर बसवण्यास विरोध करत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, ग्राहकाची लेखी परवानगी घेतल्यानंतरच मीटर बसवावेत. हा मुद्दा कायदेशीरदृष्ट्या चुकीचा आहे, असेही महावितरणचे म्हणणे आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोग या विद्युत क्षेत्रावर देखरेख करणाऱ्या स्वतंत्र संस्थेने २०२१ साली नियम जाहीर केले. त्यातील मुद्दा २.२ च्या तरतुदीनुसार, वीज ग्राहकाच्या घरात किंवा कार्यालयात मीटरनंतर फ्यूजपासून त्याची मालमत्ता असते. तर पॉईंट ऑफ सप्लाय अर्थात फ्यूजपर्यंत महावितरणची यंत्रणा असते. त्यामध्ये महावितरणने बसवलेला मीटरही समाविष्ट आहे. तसेच द इलेक्ट्रिसिटी ॲक्ट (वीज कायदा) २००३ च्या कलम ५५ नुसार वीज पुरवठा करताना त्याचे अचूक मोजमाप करण्यासाठी वीज वितरण कंपनीने मीटर बसवणे बंधनकारक आहे. अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानावर आधारित मीटर बसवून महावितरण कायदेशीर कर्तव्य पार पाडत आहे. जरी खासगी जागेवर बसवला असला तरी मीटर ही महावितरणची मालमत्ता आहे आणि वीज कायद्यातील तरतुदीनुसार महावितरण हे मीटर कधीही बदलू शकते. त्यासाठी ग्राहकाच्या परवानगीची गरज नाही. विजेचा मीटर ही महावितरणची मालमत्ता असल्याने मीटर बदलण्यास विरोध केला तर तो सरकारी कामातील अडथळा ठरेल. मीटरची नासधूस केली तर ती सरकारी मालमत्तेची नासधूस ठरेल. हे दोन्ही गुन्हे दखलपात्र आहेत आणि त्यासाठी अटक व तुरुंगवास होऊ शकतो, असा इशाराही महावितरणकडून देण्यात आला आहे. वीज मीटर बसवण्यासाठी ग्राहकाची परवानगी घेतली नाही, असे सांगून ग्राहकांना भडकावण्याचे प्रकार घडत आहेत, त्यांच्यापासून ग्राहकांनी सावध राहण्याची आवश्यकता आहे, असे आवाहनही करण्यात आले आहे.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३

ई-मेल : panvelcorporation@gmail.com
वेबसाईट www.panvelcorporation.com
जा.क्र. पमपा/पापुवि/६९६/ प्र.क्र./ /२०२५
दि. / /२०२५

### जाहीर निविदा पत्रक

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मार्केट यार्ड जलकुंभामध्ये १६० KVA क्षमतेचे डिझेल जनरेटर संच पुरविणे, बसविणे आणि कार्यान्वित करणे या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरता खाली नमूद केलेल्या बाबीकरता खालील नमुन्यात दर मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मार्केट यार्ड जलकुंभामध्ये १६० KVA क्षमतेचे डिझेल जनरेटर संच पुरविणे, बसविणे आणि कार्यान्वित करणे. | १३/०६/२०२५ ते १९/०६/२०२५ (७ दिवस) |

### Specification

| Sr No | Description | Unit | QTY |
|---|---|---|---|
| 1 | Item No 1:- Supplying, erecting, testing and commissioning of diesel generating set with alternator of 160 kVA output continuous rating, 3 Phase,415 V, 50c/s 0.8 p. f. A.C supply, a totally enclosed air cooled / liquid cooled multi-cylinder diesel engi ne developing s uitable BHP at 1500 rpm with 10% overload for 1 hour in 12 hours, along with standard accessories, self-excited, self-regulated, scree n protected alternator with static excitations ystem running at 1500 RPM as per IS 4722-2001 with voltage regulation +/-5 %, with performance class G2 and maximum fuel consumption 27.8 Ltr/hr@75% loa ding. Both the engine and alternator direct coupled on a common fabricated steel base frame and mounted on anti-vibrating pads with standard control panel comprising meters, switchgears, indicators connected with suitable wires/cables, the complete set enclosed in composite Acousticenclosure as fully assembled integral unit made of 16 SWG CRCA Sheet,s ound absorbing material to restrict sound level up to 75 dB at 1.0 m,provided with first filling of oil, diesel not less than 290 Ltr etc. on provided M20 Grade CC Foundation as per specification no. GEN-DG. | No. | 1 |

वर नमूद सूचित दर्शविलेल्या बाबीचे पुरवठा करणारे पुरवठादार/दुकानदार/उत्पादक/विक्रेते/यांनी नमूद केलेल्या बाबीकरता असलेले दर स्वतःच्या लेटरहेडवर महापालिकेच्या कार्यालयात अथवा ई-मेल द्वारे panipurvathaoffice@gamil.com यावर दिनांक १९/०६ / २०२५ पर्यंत पाठवावे हि विनंती, सदर दर हे अंदाजपत्रक तयार करणेसाठी गृहीत धरण्यात येणार आहेत.

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.२५३/२५५/२०२५
दिनांक :- १२/०६/२०२५

प्रत माहितीस्तव -
१. प्रसिद्धीकरता.
२. माहिती फलक करिता.

सही/-
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका

# मुंबई अहमदाबाद महामार्गावर गुटखा तस्करांना अटक
## दोन तस्कर फरार, लाखोंचा मुद्देमाल जप्त

**मनोर, दि. १२ : प्रतिनिधी**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वरई पारगाव रस्त्यावर मनोर पोलिसांनी पाठलाग करत दोन कार पकडल्यानंतर त्यात लाखो रुपयांचा गुटखा पोलिसांच्या हाती लागला. यावेळी एका कारसह दोन जण पळून जाण्यात यशस्वी ठरले आहेत. यावेळी पोलिसांनी एका कारचालकाला अटक केली आहे.

वरई पारगाव रस्त्यावरून मुंबई अहमदाबाद महामार्गाच्या दिशेने गुटख्याची बेकायदेशीर वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती मनोर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांना मिळाली होती. माहिती नुसार पोलिसांच्या पथकाने पहाटेच्या सुमारास गुंदावे गावाच्या हद्दीत सापळा रचला होता. सकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास वरई पारगाव रस्त्यावरून वरई फाट्याच्या दिशेने तीन कार एका मागून एक भरधाव वेगाने जात असल्यामुळे पोलिसांना तिन्ही वाहनांची हालचाल संशयास्पद वाटली. त्यामुळे पोलिसांनी तिन्ही कार चालकांना थांबण्याचा इशारा दिला.

पोलिसांच्या इशाऱ्यानंतरही तिन्ही कार चालकांनी वेग वाढवून पळून जाण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांनी कार थांबावण्याचा प्रयत्न केला. यावेळी एका कार चालकाने पोलिसांच्या पथकातील वाहनाला धडक



दिली.त्यामुळे पोलिसांनी त्यांच्या पथकातील दुसरे वाहन आडवे टाकत दोन कार रोखून धरल्या. कारवाई दरम्यान एक कार चालक कारसह पळून गेला. तर एक कारचालक कार टाकून पळून गेला. पोलीस कर्मचाऱ्यांनी दोन्ही कारची तपासणी केली असता एका कारमध्ये विमल पान मसाला आणि सुगंधित तंबाखूची पाकिटे आढळून आली. कार मधील दोन लाख 35 हजार रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे.कार चालक प्रशांत पाटील याला अटक करण्यात आली असून अन्य दोन कार चालक आरोपी फरार झाले आहेत.

कार चालक प्रशांत राजू पाटील (वय. 30 रा. शिरसाड ता. वसई) याला अटक करण्यात आली असून न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. हेमंत पाटील (रा.कुंभार पाडा, विरार )आणि कन्हेय्या (रा. फुलपाडा विरार)फरार झाले आहेत.

गुटखा वाहतूक करणाऱ्या दोन्ही कार मधून दोन लाख 35 हजार 836 रुपयांचा गुटखा (विमल पान मसाला आणि सुगंधित सुपारी ) मिळून आला आहे. कारवाई दरम्यान अकरा लाख 35 हजार 836 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई मनोर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणवीर बयेस यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक अनिल भोये, पोलीस हवालदार अयुब शेख, प्रशांत गायकर, अक्षय अतकारी आणि योगेश पाटील यांनी केली. याप्रकरणी पोलीस हवालदार अयुब शेख यांनी मनोर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून तिन्ही कार चालकां विरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम 123.233,274,275 आणि अन्न सुरक्षा मानदे कायदा 2006 आणि नियमने 2011च्या कलम26(2),27,23, 26(2)(4) आणि 30(2) A नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 16 जून रोजी 24 तासांसाठी भिवंडीत पाणीबाणी

**भिवंडी, दि. १२ : प्रतिनिधी**

भिवंडीत सोमवार १६ जून रोजी २४ तासासाठी भिवंडी शहरातील स्टेम प्राधिकरणा द्वारा होणारा पाणी पुरवठा बंद राहणार असल्याची माहिती भिवंडी महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाच्या वतीने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे. स्टेम वॉटर डिस्ट्री, अँड इन्फ्रा, कंपनी प्रा.लि. ठाणे यांचेकडून दैनंदिन देखभाल दुरुस्ती करीता सोमवार १६ जून सकाळी ९.०० वाजे पासून ते मंगळवार १७ जून सकाळी ९.०० वाजता पर्यंत २४ तासांचा शटडाऊन घेण्यात येणार आहे.त्यामुळे भिवंडी शहरासाठी स्टेम मार्फत होणारा पाणी पुरवठा बंद राहणार आहे.तर पुढील एक दिवस कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होणार आहे.याची नागरीकांनी नोंद घेऊन पाणी जपून वापरावे असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने शहरवासीयांना केले आहे.

# उल्हासनगर रेल्वे स्थानकात असलेल्या समस्या सुटणार

**उल्हासनगर , दि. १२ प्रतिनिधी**

उल्हासनगर रेल्वे स्थानकात अनेक गंभीर समस्या असुन ह्या समस्या सोडवन्यासाठी आज रेल्वे प्रशासनाने आयोजित केलेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा करुन या समस्यावर लवकरच चांगला तोडगा निघणार असल्याची माहीती अॅड . प्रशांत चंदनशिव यांनी दिली आहे .

उल्हासनगर रेल्वे स्थानकात दोन प्लॅटफॉर्म आहेत. या दोन्ही प्लॅटफॉर्मवर अनेक समस्या आहेत .तेव्हा या दोन्ही प्लॅटफॉर्मवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावेत म्हणुन अॅड . प्रशांत चंदनशिव यांनी पत्रव्यवहार करुन मागणी केली आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने आपल्या कार्यालयातच बैठक घेवुन उपस्थित असलेल्या समाजसेवका समोर स्थानकातील समस्या सोडवन्याचे आश्वासन दिले आहे . या बैठकी ला उल्हासनगर शहरातील प्रवासी वर्ग तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणारे अॅड . प्रशांत चंदनशिव, मुकेश भाटिया, आकाश मेंजी, उमेश देबनाथ. युवा सेने चे सुशील पवार, रवी वर्मा , शिवनेरी फाउंडेशन चे रवींद्र मिंडे हे उपस्थित होते. दरम्यान उल्हासनगर रेल्वे स्थानका मध्ये असलेल्या खालील समस्यावर चर्चा करन्यात आली आहे. बंद असलेला सरकता जिना त्वरित सुरू करावा, स्थानकावर होम गार्ड नाही, तर आरपीएफच्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्या यावी , बंद असलेले शौचालय सुरू करुन प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर असलेल्या शौचालयाची साफ सफाई करण्यात यावी ,सोबतच पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात यावे , तर अॅम्ब्युलन्स सुरू करण्यात यावी , कचऱ्याचे डब्बे बसवुन सफाई कर्मचारी पूर्ण वेळ उपलब्ध करुन देण्यात यावा , त्याच प्रमाणे प्लॅटफॉर्म क्रमांक १ ची उंची वाढविण्यात यावी , दरम्यान टी सी उपलब्ध करून देण्यात यावा , तिकीट खिडकी वेळेत सुरू करुन प्रवाशाना चांगल्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात या सर्व विषयावर साधक बाधक चर्चा करण्यात आली आहे .

# उल्हासनदीवर बांधलेला एंटीलिया घाट तोडण्याचे आदेश

**उल्हासनगर , दि. १२ प्रतिनिधी**

उल्हासनगरचे आमदार कुमार आयलानी यांनी आपल्या सात कोठी रुपये निधीतुन उल्हासनदीवर एंटीलिया घाट तयार केला आहे. हा घाट पुर्णता अनधिकृत असुन नदी पात्रात बांधल्याने हा घाट तोडन्याचे आदेश ठाणे जल संपदा विभागाने दिले आहेत. या बाबत हिराली फाऊंडेशन च्या अध्यक्षा अॅड. सरिता खानचंदानी यांनी पाठपुरावा करत आयलानी यांना दणका दिला आहे.

उल्हासनगर विधानसभा क्षेत्राचे आमदार कुमार आयलानी यांच्या सात कोटी रुपये निधीतुन उल्हासनदीवर एंटीलिया घाट तयार केला आहे. या घाटाचे बांधकाम २०२२ पासुन सुरु केले असुन या घाटाचे काम पुर्ण झाले आहे . तर लवकरच घाट सुरु करण्याची प्रक्रिया होणार आहे . या घाटाचे बांधकाम करताना त्या जागेवरील झाडे तोडन्यात आली असुन नदी पात्रात मातीचा भराव करुन पात्र लहान केले आहे . ही बाब हिराली फाऊंडेशन च्या अध्यक्षा अॅड . सरिता खानचंदानी यांच्या लक्षात येताच त्यांनी प्रथम उल्हासनगर महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरणा कडे लेखी तक्रार केली असता महापालिके कडुन कोणती ही कारवाई होत नसल्याचे लक्षात येताच खानचंदानी यांनी ठाणे जिल्हाधिकारी व जलसंपदा विभाग ठाणे यांच्या कडे लेखी तक्रार केली . तेव्हा जल संपदा विभागाने तक्राराची दखल घेत सदर घाटाची पाहणी केली असता हा घाट अनधिकृत पणे बांधला असुन नदी पात्रात भराव केल्याचे निदर्शनास आले . दरम्यान हा घाट करोडपती बापांच्या वाया गेलेल्या मुलांसाठी तयार केला असुन या घाटावर दारुच्या बाटल्याचा खच सुध्दा दिसुन आला आहे. तेव्हा जल संपदा विभाग यांनी सदर घाट तोडन्याचे आदेश दिले असल्याने आमदार कुमार आयलानी यांच्या निधीतील सात कोटी रुपये उल्हासनदीत डुबणार आहेत. सदर घाट हा गणेश विसर्जनासाठी बांधल्याचा दावा कुमार आयलानी यांनी केला त्या जागेवर २०० झाडे लावले असुन अजुन १००० झाडे लावणार असल्याचे पोकळ आश्वासन आयलानी यांनी दिले आहे. तर नदी काठावरील झाडे तोडुन नदी पात्रात मातीचा भराव करुन प्रवाह वळवन्याचा प्रयत्न हा धोकादायक आहे. हे बांधकाम अनधिकृत असुन जल संपदा विभागाने घेतलेला निर्णय योग्य असल्याची प्रतिक्रिया अॅड. सरिता खानचंदानी यांनी दिली आहे.

# अशोक धोडी हत्याकांडातील आणखी एक आरोपी जेरबंद

**तलासरी, दि. १२ : प्रतिनिधी**

तलासरी तालुक्यातील वेवजी येथील अशोक धोडी यांच्या अपहरण व खून प्रकरणातील फरार आरोपीला पालघर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १२ जून रोजी शहापूर (जि.ठाणे) येथून अटक केली आहे. या कारवाईमुळे पोलीस तपासाला मोठी चालना मिळाली असून गुन्हे शाखेने या प्रकरणात आणखी एक महत्त्वाचे पाऊल पुढे टाकले आहे. १९ जानेवारी २०२५ रोजी अशोक रमण धोडी (वय ५२) यांचे अपहरण करून खून करण्यात आला होता. हा खून घरपट्टी आणि जमिनीच्या वादातून करण्यात आल्याचे तपासात उघड झाले असून, त्यांच्या सख्ख्या भावाने अविनाश धोडी यानेच हा कट रचून काही साथीदारांच्या मदतीने अपहरण केले होते. नंतर त्यांचा खून करून मृतदेह कारसह गुजरातमधील सरीगाम (ता.उमरगाव,जि.वलसाड) येथील खदानीत फेकण्यात आला होता. या प्रकरणात आतापर्यंत ६ आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित ३ आरोपी फरार होते. त्यातील एक आरोपी मनोज भवरसिंग राजपूत (वय ३४, रा. काकलवास, ता. देसुरी, जि. पाली, राजस्थान) याला शहापूर येथे अटक करण्यात आली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, डहाणू उपविभागीय पोलीस अधिकारी अंकिता कणसे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील (स्थानिक गुन्हे शाखा, पालघर), पोउनि रविंद्र वानखेडे, गोरखनाथ राठोड, पोहवा दीपक राऊत, संदीप सरदार, नरेंद्र पाटील, राकेश पाटील, कैलास पाटील, दिनेश गायकवाड, भगवान आव्हाड, पोअंमलदार महेश अवतार यांच्या पथकाने ही कारवाई केली. गुन्ह्यातील उर्वरित फरार आरोपींचा कसून शोध सुरू असून लवकरच त्यांनाही अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# राज्य नगरविकास विभागाचे आदेशानुसार होणाऱ्या भिवंडी मनपाच्या प्रभाग रचनेकडे नागरिकांचे लक्ष




**भिवंडी, दि. १२ : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीनंतर प्रतीक्षेत असलेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या हालचालीला राज्याच्या प्रशासकीय पातळीवरून सुरुवात झाली असून "ड " वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश-२०२५ भिवंडी महानगरपालिकेस आज(११जुलै) रोजी मिळाले आहेत. त्यानुसार पालिकेच्या निवडणुक कार्यालयात कागदपत्रांची जुळवाजुळव सुरु झाली असून शासन निर्देशानुसार भिवंडी महानगरपालिकेच्या नवीन प्रभाग रचनेकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. भिवंडी महानगरपालिका हि "ड " वर्ग महानगरपालिका असून सन २०११ साली केलेल्या शहराच्या जनगणनेनुसार मनपा क्षेत्राच्या हद्दीतील नागरिकांची लोकसंख्या सुमारे ७ लाख ९ हजारापेक्षा जास्त आहे. मात्र गेल्या १४ वर्षात शहरात झालेल्या विकासानुसार येथील लोकसंख्या वाढली आहे. त्यानुसार नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून त्यांना अपेक्षित मूलभूत सुविधा मिळत नाही. तर स्थानिक काही लोकप्रतिनिधींनी गेल्या १० वर्षात शासनाकडून मोठा निधी उपलब्ध करून घेतला. मात्र महानगरपालिका "क" वर्गामध्ये नेऊ शकले नाही. तर काही लोकप्रतिनिधी हि नगरपालिका " ड "मध्ये राहावी याच मानसिकमध्ये राहून शहराची स्थिती जैसे थे ठेवण्याच्या प्रयत्नात असल्याचे दिसून येते.यापूर्वी राज्य शासनाने २०२२ मध्ये निवडणूक घेण्याचे ठरविले होते. त्यासाठी राज्यशासनाने दिलेल्या आदेशानुसार ३ वार्ड सदस्यांचा एक प्रभाग बनविला होता. त्यानुसार अंतिम यादी देखील तयार करून शासनाकडे पाठविली होती. मात्र कोर्टाच्या आदेशानुसार हि निवडणूक प्रक्रिया थांबविण्यात आली होती. आता सर्वोच्च न्यायालयाने ६ मे २०२५ रोजी कोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार शासनाने महानगरपालिकेच्या निवडणूक प्रक्रियेस सुरुवात केली आहे. त्यानुसार त्यांनी भिवंडी महानगरपालिका प्रशासनास प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत. त्या आदेशानुसार नुसार प्रत्येक प्रभागात ४ सदस्य राहणार आहेत. सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग ३ अथवा ५ सदस्यांचा होतील. अथवा दोन प्रभाग ३ सदस्यांचे होतील.तसेच भौगोलिक सलगता राखण्याच्या दृष्टीने प्रभाग रचना करताना नागरिकांची गैरसोय टाळता येईल अशा ठिकाणी असावेत,असे नमूद केले आहे. तसेच शासनाने दिलेल्या आदेशानुसार प्रभागाची सरासरी लोकसंख्या,सदस्य संख्या, प्रभागाची संख्या, प्रभाग रचनेसाठी मार्गदर्शक तत्वे, प्रभागाच्या सीमारेषा,प्रभागाचे गुगल मॅप प्रमाणे नकाशे आदी बाबत प्रारूप रचनेसाठी सुचना व निर्देश दिले आहेत.सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर राजकीय पक्षांच्या कार्यालयात निवडणूक निमित्ताने हालचाली सुरु झाल्या आहेत. मात्र निवडणूक कार्यक्रम जाहीर न झाल्याने गेल्या काही दिवसांपासून कार्यकर्ते आणि पुढारी केवळ भेटीगाठी आणि चर्चेवर भर देत होते. मागील निवडणुकीत भिवंडी महानगरपालिकेचे एकूण ९० नगरसेवक निवडून आले होते. त्यामध्ये ४५ पुरुष व ४५ महिला नगरसेविका यांचा समावेश होता. त्यावेळी एकूण ४ वार्ड सदस्यांचा एक प्रभाग होता. त्यामुळे २१ प्रभाग ४ सदस्यांचे आणि २ प्रभाग ३ सदस्यांचे होते. आता प्रभाग रचना नव्याने होणार असल्याने सत्तेचे गणित मांडणाऱ्या अपक्ष नगरसेवकांच्या आणि राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. शहरातील समस्या "आ" वासून बसल्या असताना त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या उमेदवारांना या निवडणुकीत चांगलाच फटका बसणार असल्याचे दबक्या आवाजात शहरात बोलले जात आहे.

> सध्या प्राथमिक स्थितीत जनगणनेनुसार शासनाकडून प्रभाग रचना करण्याचे आदेश आले आहेत. निवडणूक निमित्ताने एकूण कार्यक्रमाचा तारखेनुसार प्रारूप व अंतिम यादी व प्रभाग जाहीर करण्याचा आराखडा शासनाकडून आलेला नाही. त्यामुळे ज्याप्रमाणे शासनाचे आदेश उपलब्ध होतात त्यानुसार कामाची सुरुवात झालेली आहे.
>
> **- अजित महाडिक, भिवंडी महापालिका, निवडणूक विभाग अधिकारी**

# बदलापूरमध्ये पान टपऱ्यांवर अमली पदार्थांची विक्री

**बदलापूर, दि. १२ : प्रतिनिधी**



बदलापुरमध्ये पान टपऱ्यांवर तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीबरोबर खुलेआम ड्रग्ज विक्री होत असल्याची धक्कादायक बाब आमदारांनी सांगितले.त्यामुळे बदलापूरमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

राज्यात ड्रग्ज विक्रीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. तरूणाई ड्रग्जच्या आहारी जात असल्याचे पाहायला मिळत आहे. सर्वात जास्त कॉलेजचे विद्यार्थी यामध्ये सापडत आहेत. अनेकांचे जीवन ड्रग्समुळे, अमली पदार्थांच्या सेवनामुळे उध्वस्त झाले आहे. आमदारांनी बदलापूरमध्ये एक गंभीर आरोप करत मोठा दावा केला आहे. बदलापूर शहरामध्ये खुलेआम ड्रग्जचा सुळसुळाट असून, पान टपऱ्या आणि चहाच्या टपऱ्यांवर ड्रग्जची सर्रास विक्री होत असल्याचा आरोप कथोरे यांनी केला आहे. दरम्यान कथोरे यांच्या आरोपांमुळे पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी ज्या भागात ड्रग्स विक्री होते. त्याचा पर्दाफाश पोलिसाव्यतिरिक्त अन्य कोणी केला तर संबंधित पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात येईल.असा इशारा दिला आहे.

विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात बोलताना आमदार कथोरे यांनी बदलापूर मध्ये ड्रग्स विक्री होत असल्याचा गौप्यस्फोट केल्याने एकच खळबळ उडाली आहे तसेच

आमदारांनी अनेकदा पोलिसांना सांगून कारवाई करायला लावली आहे," असे सांगितले त्यामुळे पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. कथोरे यांनी या प्रकारावर मोठ्या प्रमाणात आणि ठोस पद्धतीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

आमदारांनी ड्रग्स विक्रीचा मुद्दा उपस्थित केल्याने स्थानिक पोलिस यंत्रणा आणि अंमली पदार्थविरोधी पथकाच्या कार्यक्षमतेवर शंका निर्माण झाली आहे.

बदलापूरमध्ये शाळा, कॉलेज परिसर 100 मीटरच्या परीघ क्षेत्रात तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांची सर्रास विक्री होत आढळून येत आहे. त्यामुळे शाळा कॉलेजमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये याचा परिणाम जाणवत आहे.अशा तंबाखू,पान टपऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

यामुळे कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने विद्यार्थ्यांना आणि तरुणांना तंबाखू सेवनाच्या विळख्यातून बाहेर काढण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या धोरणानुसार शाळा, कॉलेज परिसरातील 100 मीटर परीघ क्षेत्रातील तंबाखू व पान टपाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# शेलार हद्दीमध्ये नदीलगत अतिक्रमण
## ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष



**भिवंडी, दि. १२ : प्रतिनिधी**

शहरा लगतच्या शेलार गावच्या हद्दीत कामवारी लगत शासकीय जागेवर पत्रे लाऊन अतिक्रमण सुरू असून स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याची तक्रार ग्रामस्थ मोनिश गायकवाड यांनी केली आहे.कामवारी नदी पात्रात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण व दूषित पाणी सोडण्याच्या तक्रारी असतानाही परिसरातील काही वर्षांपूर्वी दुर्घटनाग्रस्त झालेल्या सार्वजनिक शौचालय परिसरात हे अतिक्रमण सुरू आहे.हे अतिक्रमण त्वरित काढून टाकून अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी मोनिश गायकवाड यांनी केली आहे.दरम्यान नादुरुस्त वापरात नसलेले शौचालय आहे.तेथे जर कोणते बांधकाम सुरू असेल तर त्याची तात्काळ माहिती घेऊन अतिक्रमण हटविण्यात येईल व संबंधितांवर कारवाई केली जाईल अशी माहिती शेलार ग्रामपंचायतीचे प्रशासक सुधाकर सोनवणे यांनी दिली आहे.

# 16 जूनला शासकीय आश्रमशाळांमध्ये 'प्रवेशोत्सव'
## लोकप्रतिनिधी आणि अधिकारी विद्यार्थ्यांचे करतील आत्मीय स्वागत

**मुंबई, दि. १२ : प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या आदिवासी विकास विभागाकडून शासकीय आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठी एक आगळावेगळा उपक्रम राबवला जात आहे. १६ जून रोजी 'प्रवेशोत्सव' साजरा करण्यात येणार असून, नव्याने दाखल होणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचे स्वागत थेट लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या उपक्रमामागे आदिवासी विकास मंत्री अशोक वुईकेंची अभिनव संकल्पना असून, 'प्रवेशदिन' केवळ एक औपचारिकता न राहता विद्यार्थ्यांसाठी आनंदाचा आणि प्रेरणेचा दिवस ठरावा, असा उद्देश त्यामागे आहे.

आदिवासी भागांतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. मात्र पहिल्याच दिवशी शाळेच्या अंगणात पाऊल टाकताना त्यांना सन्मानाने आणि प्रेमाने वागणूक मिळावी, यासाठी 'प्रवेशोत्सव' उपक्रम हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती मंत्री अशोक वुईकेंनी दिली.

या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी राज्यातील सर्व खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार, पोलिस अधिकारी यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. "फक्त भाषणं नव्हे, प्रत्यक्ष हजेरी आणि विद्यार्थ्यांशी संवाद आवश्यक आहे," असा संदेश वुईकेंनी दिला आहे.

'प्रवेशोत्सव'च्या दिवशी नवागत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, मिठाई, स्वागत गीत, आणि शाळेतील वरिष्ठ विद्यार्थ्यांकडून ओळख परेड अशा स्वरूपात उत्सवी वातावरणात त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होईल आणि शिक्षणाबद्दल आकर्षण वाढेल, अशी खात्री प्रशासनाला आहे.

राज्यातील अनेक आदिवासी भागांतील मुलांना शाळेची पहिली पायरीही अनुभवता येत नाही. अशा पार्श्वभूमीवर 'प्रवेशोत्सव' हा उपक्रम फक्त शाळेचा आरंभ नव्हे, तर शिक्षणाच्या प्रवासाची जाहीर सुरुवात ठरणार आहे.

"आदिवासी विद्यार्थी केवळ शिक्षण घ्यायला नव्हे, तर या देशाच्या भविष्याचा भाग व्हायला आले आहेत – त्यांना त्याचा अभिमान वाटावा," अशी भावना या उपक्रमामागे असल्याचे वुईकेंनी स्पष्ट केले.

१६ जूनला राज्यभरातील शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये गडगडणार 'प्रवेशोत्सवाची रणधुमाळी', आणि विद्यार्थ्यांच्या जीवनात सुरू होईल एक नवीन अध्याय – प्रेरणादायी, आत्मीय, आणि सन्मानाचा!

# छगनदादा नाईक हे असामान्य व्यक्तीमत्व- आ. राजन नाईक

**वसई, दि. १२ : प्रतिनिधी**

आध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रात मानवतेचा ध्यास घेऊन वावरणारे छगनदादा उर्फ नारायण नाईक हे सामान्यातील असामान्य व्यक्तिमत्व असून , वसईच्या सांस्कृतिक इतिहासात त्यांचे नाव अग्रक्रमाणे घेतले जाईल, असे गौरवोद्गार आमदार राजन नाईक यांनी भुईगांव येथे काढले. स्वाध्याय परिवाराचे ज्येष्ठ कार्यकर्ते, तथा विद्यावर्धिनी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी नारायण गजानन नाईक यांच्या अमृत महोत्सवी सत्काराप्रसंगी त्यांना शुभेच्छा देताना आ. नाईक बोलत होते. नारायण नाईक यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त भुईगाव येथील स्वामी समर्थांच्या मठात 'स्नेहमिलन' या कार्यक्रमात त्यांचा खास सत्कार करण्यात आला. नाईक परिवार व त्यांच्या मित्र परिवारातर्फे आयोजित या हृदय सोहोळ्यात सुप्रसिद्ध पार्श्वगायक हृषीकेश बडवे आणि केतकी चैतन्य यांच्या "स्वर अमृताचा" ही सांगितीक मैफल भरवण्यात आली होती. मैफलीच्या मध्यंतरात जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बबनशेठ नाईक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सत्कार सोहोळ्यास आमदार राजन नाईक, सामवेदी ब्राम्हण संघाचे अध्यक्ष अनंत पाटील, स्वाध्याय परिवाराचे जयवंत पाटील, वसई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनोहर पाटील, वसई जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष यशवंत पाटील, महापालिका स्थायीसमितीचे माजी सभापती संदेश जाधव, माजी उपमहापौर उमेश नाईक, काँग्रेसचे कार्यध्यक्ष प्रकाश पाटील आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, तथा



सूत्रसंचालन स्वामी समर्थ मठाचे सर्वेसर्वा संदीप म्हात्रे यांनी केले. प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जपणे आपले आद्य कर्तव्य आहे. दुसऱ्याचे दुःख समजून घेत त्याला मदतीचा हात देणे, कुणाचे खूप चांगले जरी करता नाही आले, तरी किमान आपल्या हातून कुणाचेही वाईट होणार नाही, याची मात्र काळजी जरुर घ्यावी, असा निर्मळ सल्ला बबनशेठ नाईक यांनी यावेळी बोलताना दिला. वृद्धत्व हे वाढीचे लक्षण असून, या टप्प्यावर न्यूनता संपुष्टात आणली पाहिजे. आयुष्याच्या उत्तरार्धात दोष निवृत्ती, सद्गुणवृद्धी व परिपोष यासाठी प्रयत्न करण्याच्या दृष्टीने आपणच आपल्या आयुष्यात ,अर्थातच पूर्वार्धात डोकावून पाहूया. सामूहिक प्रार्थनेद्वारे संवेदनशिलतेच संवर्धन करूया. कौटुंबिक ऐक्य, शेजारधर्म निभावून नेण्यासाठी आपली सोशिकता वाढवू या, असे प्रतिपादन सत्कार्मुर्ती नारायण नाईक यांनी यावेळी करून, सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

